SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR – 416 004 MAHARASHTRA
Stat Cell : 0231-2609147.
website : www.unishivaji.ac.in
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर – ४१६ ००४ – महाराष्ट्र
सांख्यिकी कक्ष : ०२३१-२६०९१४७.
E-Mail : statcell@unishivaji.ac.in
Estd : 1962
NAAC 'A++' Grade

जा.क्र./शिवाजी वि./सांख्यिकी कक्ष/एआयएसएचई/२०२३-२४/ 91 दिनांक : 28/02/2025

# परिपत्रक

प्रति,
मा. प्राचार्य / संचालक,
संलग्नीत महाविद्यालये / मान्यता प्राप्त संस्था
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.

**विषय : अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम सन २०२३-२४**
प्रशिक्षण कार्यशाळेचे उपस्थिती प्रमाणपत्र स्वीकारण्याबाबत...

महोदय / महोदया,

उपरोक्त विषयास अनुसरून आपणास आदेशान्वये कळविण्यात येते की, मानव संसाधन विकास मंत्रालय, नवी दिल्ली यांनी अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम २०२३-२४ (www.aishe.gov.in) या वेबपोर्टलवर माहिती नोंद करण्याची सुरवात दिनांक ०८/१२/२०२४ पासुन झालेली आहे. शिवाजी विद्यापीठातील सर्व संलग्नित महाविद्यालये / संस्था मधील नोडल अधिकाऱ्यांकरिता अखिल भारतीय उच्च शिक्षण सर्वेक्षण कार्यक्रम प्रशिक्षण कार्यशाळा सांख्यिकी कक्ष व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्ष (IQAC) यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २१/०१/२०२५ रोजी राजर्षी शाहू सभागृह, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथे आयोजित करण्यात आलेली होती.

सदर प्रशिक्षण कार्यशाळेस संलग्नित महाविद्यालयातील सर्व AISHE नोडल अधिकारी यांचा चांगला प्रतिसाद मिळालेला होता. सदर प्रशिक्षण कार्यशाळेचा लाभ घेवून बहुतांश महाविद्यालयांनी सदर वेबपोर्टलवर दिलेल्या मुदतीपूर्वी माहिती यशस्वीरित्या अपलोड केलेली आहे. माहिती वेळेत अपलोड करुन सहकार्य केल्याबद्दल विद्यापीठाकडून सर्व नोडल अधिकारी यांचे आभार.

सदर प्रशिक्षण कार्यशाळेचे उपस्थिती प्रमाणपत्र त्याच दिवशी न देता इतर दिवशी यथावकाश स्वतंत्र परिपत्रकाव्दारे कळविण्यात येईल अश्या सूचना देण्यात आल्या होत्या. सदर अनुषंगाने सदर प्रशिक्षण कार्यशाळेस उपस्थित असलेल्या सर्व नोडल अधिकारी यांचे उपस्थिती प्रमाणपत्र तयार करण्यात आलेले आहे. सदर उपस्थिती प्रमाणपत्र **सांख्यिकी कक्ष, खोली क्रमांक ३१३, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर** या कक्षेत उपलब्ध करुन देण्यात आले असून विद्यापीठाच्या प्रशासकीय वेळेनुसार नोडल अधिकारी यांनी स्वीकारण्यात यावी. **नोडल अधिकारी व्यतिरिक्त इतर व्यक्तीकडून प्रमाणपत्र स्वीकारल्यास सदर व्यक्तीची रजिस्टर वर नोंद घेवून खातरजमा करुन प्रमाणपत्र देण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.**

सदर कार्यशाळेच्या प्रमाणपत्राबाबत काही अडचणी असल्यास महाविद्यालयांच्या नोडल अधिकारी यांनी. सांख्यिकी कक्ष, खोली क्रमांक ३१३, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर, दुरध्वनी क्रमांक ०२३१-२६०९१४७ येथे संपर्क साधावा.

कळावे.

आपला विश्वासू,

**कुलसचिव**